**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**हिंगोली कृषी हवामान सल्ला** **मंगळवार दिनांक – १९.११.२०१९**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक २० ते २४ नोव्हेंबर, २०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २०/११ | २१/११ | २२/११ | २३/११ | २४/११ |
| पाऊस (मिमी) | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३१.० | ३१.० | ३२.० | ३२.० | ३२.० |
| किमान तापमान (अं.से.) | १५.० | १६.० | १६.० | १६.० | १६.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | अंशत: ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६१ | ६८ | ६७ | ६० | ५८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३६ | ३८ | ४३ | ३७ | ३३ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ०४ | ०६ | ०५ | ०३ | ०३ |
| वा-याची दिशा | आग्नेय | आग्नेय | पूर्व | पूर्व | पूर्व |

| हवामानाचा इशारा | जिल्ह्यात पुढील पाच दिवसात हवामान कोरडे राहील तसेच तापमानात किंचित घट होण्याची शक्यता आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| कापूस | वेचणी अवस्था | कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी पिकात हेक्टरी पाच कामगंध सापळे लावावेत. तसेच थायोडीकार्ब ७५ डब्ल्युपी २० ग्रॅम किंवा इमामेक्टीन बन्झोएट ५ टक्के एसजी ४ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कापूस पिकाची फरदड घेऊन नये. वेचणीस तयार असलेल्या कापूस पिकाची वेचणी करून घ्यावी. |
| तुर | कळी लागणे ते फुलधारणा अवस्था | तुर पिकावर अळयांचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के २० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४.४ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| करडई | वाढीची अवस्था | करडई पिकावर पानावरील ठिपके रोगाचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब ७५ डब्ल्युपी २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी | ऊगवण अवस्था | रब्बी ज्वारीची पेरणी करून २० दिवसाचा कालावधी झाला असल्यास पिकात कोळपणी करून तणनियंत्रण करावे. |
| केळी | वाढीची अवस्था | केळी बागेत सिगाटोका रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रोपीकोनॅझोल १० मिली + स्टिकर प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. केळी बागेतील तणांचे नियंत्रण करावे. |
| द्राक्ष | वाढीची अवस्था | द्राक्ष बागेत भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी रोगनाशकाची फवारणी करावी. तसेच द्राक्ष बागेतील तणांचे व्यवस्थापन करावे. |
| भाजीपाला | वाढीची अवस्था | मिरची पिकावरील फुलकिडींच्या व्यवस्थापनासाठी फिप्रोनील ५ टक्के २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| फुलशेती | वाढीची अवस्था | फुलपिकातील तणांचे व्यवस्थापन करावे. |
| पशुधन व्यवस्थापन | -- | पशुधनावर विशेषत: गोवर्गीय पशुवर गोचीडाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे याच्या भौतीक व्यवस्थापनासाठी गव्हाणीतील व गोठयातील गोचीडांची अंडी गोळा करून गोठयाबाहेर शेकोटी करून जाळून टाकावेत. |

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.